## व्हेरीफिकेशन

स.क्रि.के.नं.          /२०२३

यात मी फिर्यादी श्री. शहीदुलरहीमान साहेबलाल पिरजादे, व.व. ४० धंदा- शेती व रियल इस्टेट एजंट रा. शास्त्री चौक, नदीवेस, माळी गल्ली, मिरज ता. मिरज जि. सांगली आज मुक्काम मिरज सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी व्यवसायाने शेतकरी असून माझा रियल इस्टेट एजंट चा व्यवसाय देखील आहे. माझे जावई इस्माईल पिरजादे रा. जवाहरनगर इचलकरंजी या ठिकाणी रहात असून माझे जावई इस्माईल पिरजादे यांचे नदीम देसाई म्हणजेच आरोपीचा मुलगा यांचेशी मैत्री संबंध होते व आहेत. सदर मैत्रीच्या संबंधातून आरोपीचा मुलगा नदीम देसाई हा माझे जावईच्या म्हणजेच इस्माईल पिरजादे यांचे घरी येणे जाणे होते व त्यातून आरोपी देखील माझे जावईचे घरी येत असलेमूळे व मी देखील माझे कुटुंबासोबत मिरजेतून मुलगी हिना हिच्याकडे म्हणजेच जावई इस्माईल पिरजादे यांचेकडे इचलकरंजी येथे येत होतो. त्यातूनच आरोपीचे व माझे देखील मैत्रीचे संबंध प्रस्थापीत झाले व त्यातून मी व माझे कुटुंबीय देखील आरोपींचे घरी येत जात होतो व बऱ्याच वेळा आरोपीस मी व माझे कुटुंबीयांनी आर्थिक मदत केलेली आहे.

आरोपी जिल्हा व तुकडी कोल्हापूर तालुका व पोटतुकडी हातकणंगले पैकी इंदिरानगर हौसींग सोसायटी येथील प्लॉट नं.१६२/अ इचलकरंजी (कबनुर) येथील मिळकत याचा गट नं.१९/३/ब मधील प्लॉट नं.१६२/अ क्षेत्र १६२० चौ.फुट यासी चतु:सिमा:- पुर्वेस:- प्लॉट नं.१६२/ब, पश्चिमेस:- रवी भंडारे यांची मिळकत, दक्षिणेस:- रेळेकर यांची मिळकत व उत्तरेस:- समाईक रस्ता अशा चतु:सिमेतील वर उल्लेख केलेली मिळकत आरोपी यांनी त्यांच्या कौटुंबीक गरजेपोटी विल्हे विक्री करण्याचे ठरविले व सदर मिळकत आरोपीच्या मालकीची असलेबाबतचे मला सांगितले होते.

वर कलम २ मधील मिळकत आरोपीने विल्हे विक्री करणार आहेत व आरोपीस आर्थिक अडचण आहे असे आरोपीने मला समक्ष भेटून सांगितली व सदर मिळकत आरोपीच्या मालकीची आहे व सदरची मिळकत मला, ''विकत घेता का'', असे विचारले. मी माझे कुटुंबीयांशी चर्चा करुन व आरोपीचे व माझे मध्ये बैठक झाली व कलम २ मध्ये नमूद मिळकत र.रु.७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख मात्र) या रक्कमेस आरोपी यांनी मला खरेदी देणेचे मान्य केले. त्या अनुषंगाने मी र.रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख मात्र) रोख इसारत म्हणून आरोपी यांना दिलेली आहे त्याची वेगळी पावती केलेली नाही व उर्वरीत रक्कम रु.६१,००,०००/- (रुपये एकसष्ट लाख मात्र) खरेदीपत्राचे वेळी मी आरोपीस देणेचे होते. सदर मिळकतीवर र.रु.३५,००,०००/- (रुपये पसतीस लाख मात्र) इतक्या रक्कमेचे जनता गृह निर्माण संस्थेचा बोजा होता व आहे. सदरचा बोजा आरोपी यांनी दि.०१/०७/२०२३ रोजी अखेर फेडून त्याचा नाहरकत दाखला घेवून आरोपी यांनी मला आरोपीचे मालकीची कलम २ मधील नमूद मिळकत खरेदी देणेचे मान्य केले. व्यवहाराची मुदत दि.३०/०१/२०२३ पासून ६ महिने म्हणजेच दि.०१/०७/२०२३ रोजी पर्यंत ठरली होती व मिळकत खरेदी संदर्भातला व्यवहाराचा खर्च म्हणजेच करारपत्र व खरेदीपत्राला खर्च मी करणेचे मान्य केले होते. सदर वर उल्लेख केलेल्या व्यवहारा संदर्भात तसा लेखी करार माझे व आरोपी यांचेमध्ये दि.३०/०१/२०२३ रोजी नोटरी ॲड. श्री. व्ही. आर. वाटवे रा. मिरज यांचे समोर झाला. सदर लेखी करारास रमेश अशोक कुंजीरे व मुजम्मील महंमदशिराज मुल्ला असे दोन साक्षीदार यांचे समक्ष सदरचा करार नोटराईज्ड झालेला आहे.

त्यानंतर आरोपी यांनी वर कलम ३ मधील ठरलेल्या कराराप्रमाणे जनता गृह निर्माण संस्थेचे कर्ज र.रु.३५,००,०००/- भरले नाही व बोजा भागवला नाही. मी आरोपीस कलम ३ मधील ठरलेल्या कराराप्रमाणे बोजा भागवून खरेदीपत्र

करुन देणेबाबत वारंवार फोनवरुन व प्रत्यक्ष आरोपीची भेट घेवून विचारले. परंतू आरोपी यांनी मला तांत्रीक अडचण सांगितली व सदर मिळकत ही गृहनिर्माण संस्थेची आहे, खरेदीपत्र करणे तांत्रीकदृष्ट्या अडचणीचे आहे व आरोपीच्याकडे जनता गृहनिर्माण संस्थेचे कर्ज कलम ३ मध्ये ठरल्या प्रमाणे भरणेस रक्कम उपलब्ध नाही असे सांगितले व माझ्याकडून वर कलम ३ मध्ये नमूद केलेली घेतलेली इसारत र.रु.९,००,०००/- परत करुन दि.३०/०१/२०२३ रोजी झालेले कलम ३ मधील करारपत्र रद्द करणेचा प्रस्ताव आरोपीने माझ्याकडे ठेवला. तो प्रस्ताव मी मान्य केला.

आरोपीने मला कलम ३ मध्ये नमूद घेतलेली दि.३०/०१/२०२३ रोजीची इसारत र.रु.९,००,०००/- परत करणेचे मान्य करुन आरोपींचेकडे रोख रक्कम नसलेमुळे आरोपी यांनी मला कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर शाखा ५९२१ खंजीरे मळा, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर या बँकेचे र.रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख मात्र) चा चेक दि.१८/१०/२०२३ रोजीचा आरोपीचे खातेवरील खाते क्र.०११३११००२००३१६३ चा चेक क्र.००००९५ चा चेक स्वत: भरुन सही करुन अक्षरी व अंकी र.रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख मात्र) भरुन माझे नांव लिहून सही करुन दिला व आरोपींचेकडे रोख रक्कम नसलेमुळे आरोपीस रक्कमेच्या जुळणीकरीता ३ महिनेचा अवधी लागणार असलेमुळे आरोपीने मला दि.१८/१०/२०२३ रोजीचा चेक दिला व तसा दि.३०/०१/२०२३ रोजी झालेले खरेदीपूर्व करारपत्र रद्दबातल केलेबाबतचे म्हणजेच करारपत्र रद्द लेख दि.१८/०७/२०२३ रोजी नोटरी ॲड. श्री. के. बी. घेवारे रा. मिरज यांचे कडे नोटराईज्ड करुन रमेश अशोक कुंजीरे व आजम महंमद काजी या साक्षीदारासमक्ष लिहून नोंदवून आरोपीने दिलेला आहे. सदर दि.१८/०७/२०२३ रोजीचे करारपत्र रद्दलेख लिहून देताना आरोपीनी मला माझे नांवे वर उल्लेख केलेला चेक आक्टोबर २०२३ मध्ये वटवून घ्या असे सांगितले होते. त्यामूळे आरोपीने मला वर उल्लेख केलेला चेक देताना

दि.१८/१०/२०२३ अशी तारीख आरोपीने लिहून दिलेली होती. आरोपी यांनी दिलेला वर नमुदचा सदरचा चेक मला देतेवेळी चेक वरील रक्कम वटेल व मला रक्कम मिळेल अशी हमी आरोपीने दिली होती.

आरोपींचे विश्वास ठेवून मी आरोपीने दिलेला वर नमुदचा चेक माझे खाते असलेले बँक ऑफ महाराष्ट्र शाखा मिरज या बँकेत त्यांचे खातेवर दि.२१/१०/२०२३ रोजी जमा केला असता तो चेक दि.२६/१०/२०२३ रोजी **''फंड्स इनसफिशियन्ट''** असा शेरा होवून न वटता परत आला. आरोपीने वर उल्लेख केलेला न वटणारा चेक देवून जाणुनबुजून मला आर्थिक नुकसान पोहचवणेच्या उद्देशाने दिलेला आहे व माझा विश्वासघात करुन आर्थिक नुकसान पोहचवलेले आहे.

त्यामुळे मी आरोपी यांना दि.०२/११/२०२३ रोजी त्यांचा वकील श्री. एस. पी. बाटघर यांचे मार्फत रजिस्टर नोटीस पाठवून वर उल्लेख केलेली चेक वरील रक्कम मागणी नोटीस पाठवली. सदरची नोटीस आरोपी यांनी दि.०७/११/२०२३ रोजी स्विकारली आहे. परंतू सदरची नोटीस स्विकारुन देखील आरोपीने चेक वरील रक्कम मला दिलेली नाही अगर नोटीसीस उत्तर देखील दिलेले नाही. त्यामूळे सदरची फिर्याद मला या मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे. त्यामूळे माझी विनंती की, आरोपीने केलेल्या गुन्ह्याची चौकशी होवून आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन व दंड व्हावे.

म्हणून केले व्हेरीफिकेशन.

मिरज

दि. /१२/२०२३

फिर्यादी

समोर

Sd/-
V. V. Khulape

मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो. मिरज